**आदेश निशाणी क्र. २४ करीता**

०१. प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र. ०२ यांनी त्यांच्याविरुध्द मुळ अर्जास 'म्हणणे नाही' आदेश रदद होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. सामनेवाला क्र. ०२ याचे असे कथन आहे की, सामनेवाला क्र. ०२ यांना मुदतीत म्हणणे देण्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती प्राप्त करणे, तसेच, त्यासाठी गावाहुन वरच्यावर सातारा येथे वकीलांकडे जाणे शकय झाले नाही. त्यामुळे, तसेच, सामनेवाला क्र. ०२ हिची प्रकृती अवस्थोमुळे देखील याकामी म्हणणे तत्काळ तयार करता आले नाही. त्यामुळे याकामी सामनेवालाविरुध्द म्हणणे नाही असा आदेश झाला आहे. परंतु, सामनेवाला हिने जाणुनबुजुन म्हणणे देण्यास टाळाटाळ केलेली नाही. त्यामुळे, सामनेवालातर्फे म्हणणे अभिलेखावर येवुन कामकाज गुणदोषांवर चालुन निर्णय होण्यास आवश्यक आहे. सबब, सामनेवाला क्र. ०२ हिने तिचेविरुध्दचा आदेश रदद होवून म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

०३. अर्जदार हिने तिचे म्हणणे निशाणी क्र. **००** कडे देवुन अर्जास तिव्र विरोध दर्शवला आहे. अर्जदार हिचे असे कथन आहे की, सामनेवाला क्र. ०२ हे नोटीस मिळाल्यानंतर याकामी हजर झाले असुन अर्जदार हिच्या मुलाचा ताबा मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला होता. सामनेवाला क्र. ०२ व तिचे वकील न्यायालयात ब–याच तारखांना हजर देखील होते. परंतु, केवळ अर्जाचे कामकाज लांबवणीवर टाकण्यासाठी

जाणीवपुर्वक म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील नमुद कारण संयुक्तिक व योग्य नाही. सबब, अर्जदार हिने प्रस्तुत अर्ज नामंजुर करणेची विनंती केली. यदाकदाचित अर्ज मंजुर करणेचे झालेस सामनेवाला हिच्यावर र.रु. २०००/- दंड करण्याची विंनती केली.

०४. अर्जदार व सामनेवाला क्र. ०२ यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०५. अर्जदार हिने मुळ अर्ज हा कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये दाखल केला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, सामनेवाला क्र.०२ ही दि. २२.०२.२०२४ रोजी अर्जाचे कामी हजर होवुन निशाणी क्र. ०७ कडे 'म्हणणे' देण्यास मुदत मिळणेकरीता अर्ज दिला आहे. तदनंतर, सामनेवाला क्र. ०२ हिने निशाणी क्र. ०९ कडे तिचा नातु कौस्तुभ याचा अर्जदार हिचेकडून ताबा मिळणेसाठी अर्ज दिलेला आहे. सदरचा अर्ज गुणगुणावर नामंजुर करणेत आला आहे. त्यानंतर, सामनेवाला क्र. ०२ गैरहजर असल्याचे दिसुन येते. त्यानंतर सामनेवाला क्र. ०२ हिने प्रस्तुतचा अर्ज दि. २६.०९.२०२५ रोजी दिलेला आहे. यावरुन सामनेवाला क्र. ०२ हिने म्हणणे देण्यास बराच कालावधी लावल्याचे दिसुन येते.

०६. प्रस्तुतच्या मुळ अर्जाद्वारे, अर्जदार हिने तिचा सामनेवाला यांनी केलेल्या शाररिक व मानसिक छळ तसेच, दरमहा पोटगी, घरभाडे वैगरे मागणीसाठी कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदयान्वये दाखल केला आहे. त्यामुळे, अर्जदार

व सामनेवाला यांचे वादाचे निराकरण करण्यासाठी सामनेवाला क्र. ०२ यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे व त्याकरीता ते दाखल करत असलेले 'म्हणणे' अभिलेखावर घेणे न्यायोचीत होईल. तसेच दोन्ही पक्षकारांनी मांडलेल्या बाजु विचारात घेवुनच त्याबाबतचा न्याय करणे योग्य होईल. त्यामुळे, जर सामनेवाला यांचे 'म्हणणे' अभिलेखावर घेण्यास परवानगी दिलेस अर्जदाराचे काहीही नुकसान होणार नाही. परंतु, सामनेवाला क्र. ०२ यांनी मुळ अर्जास 'म्हणणे' देण्यास जो विलंब केला आहे, त्याचे अर्जातील नमुद कारण योग्य व संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे, सामनेवाला यास अर्ज त्यांच्यावर वादर्ख (cost) लादुन मंजुर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

०१ अर्ज निशाणी क्र. २४ मंजुर करणेत येत आहे.

०२. सामनेवाला क्र. ०२ यांनी अर्जाचा वादखर्च (cost) म्हणुन अर्जदार हिस र.रु. १०००/- (र.रु. एक हजार फक्त ) पुढील नेमले तारखेपर्यंत दयावेत.

०३. अर्जदारास वाद खर्च मिळाल्यानंतरच सामनेवाला क्र. ०२ यांचे ‘म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2025.10.09 05:50:44 +0530

स्थळ : मेढा

तारीखक : ०९.१०.२०२५

(डॉ. विक्रम अं. आव्हाड)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा